# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 127(1) (अ) च्या
**{मालमत्ता कर विभाग}** तरतूदी अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत व जमिनी करीता GIS Data Collect करुन मालमत्ता कर आकारणी करण्याचे कार्य निरंतर सुरु असते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण VIII चे कराधान नियम 39 च्या तरतूदी अन्वये "मालमत्ता कर वसुल करण्याकरीता तरतूद केलेल्या रीतीने वसुल करता येईल असे या अधिनियमान्वये किंवा तदनुसार जाहिर करण्यात आले असेल असा कोणताही कर किंवा अशा कोणत्याही कराचा कोणताही हप्ता देय होईल तेव्हा मा. आयुक्तांनी फारसा विलंब न लावता उक्त कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस, तिने देय असलेल्या रक्कमेचे देयक देण्याची व्यवस्था केली पाहिजे."

तसेच कराधान नियम क्र. 41 च्या तरतूदीन्वये पहिल्या सहामाहीची मागणी रक्कम करदात्यांस मागणी देयक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत महानगरपालिका निधीत करदात्यांनी जमा करणे अनिवार्य आहे. त्यामूळे कोणत्या दिनांकास संबंधित करदात्यांला देयक तामील झालेले आहे त्याबाबतचा पूरावा विभागाकडे असणे गरजेचे आहे. त्याकरीता प्रत्येक मागणी देयकाची मूळ प्रत व कार्यालयीन प्रत अशा दोन प्रती छापणे गरजेचे आहे.

आर्थिक वर्ष 2024-2025 चे मालमत्ता कर मागणी देयके भारतीय डाक विभागाने Speed Post चे माध्यमातून वितरीत करण्याकरीता एकुण 562926 Articles Booked केले, यापैकी 282955 मालमत्ताधारकांना Speed Post द्वारे मागणी देयक प्राप्त झाले असून, याची पोच कार्यालयास प्राप्त झाली आहे. अशा मालमत्ता करीता दोन प्रतीत मागणी देयक छपाई करणे वगळल्यास खुला भुखंड व पत्ते अद्यावत नसलेले मालमत्तांकरीता मागणी देयकांची दोन प्रती छपाई करणे आवश्यक राहील. आर्थिक वर्ष 2025-26 एकुण 750881 मालमत्तेचे सर्वेक्षण झालेले असून 313000 वजा जाता उर्वरीत 437881 मालमत्तांचे मागणी देयक दोन प्रतीत छपाई करावे लागेल. तसेच 1 लक्ष Wastage लक्षात घेता एकुण (437881 X 2 = 875762 + 313000+100000=12,88,762) मागणी देयक छपाई करावे लागतील.

उक्त काम सामान्य प्रशासन विभाग म.न.पा. यांचे दर करार क्र.साप्रवि/409/एम. दि. 01/10/2021 अन्वये JobWorks करीता 2.25/- प्रती प्रमाणे निश्चित असलेल्या दराप्रमाणे करण्यात येत आहे. किमती दर प्रमाणे 13,18,807 मालमत्ता कर मागणी देयक करीता रु. 28,99,715/- खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च पद क्र. A29000622005 या पदातंर्गत खर्च करण्याचे प्रावधान असून या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 25/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 24/04/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसुल), मालमत्ता कर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 127(1) (अ) च्या तरतूदी अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील

इमारत व जमिनी करीता GIS Data Collect करुन मालमत्ता कर आकारणी करण्याचे कार्य निरंतर सुरु असते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण VIII चे कराधान नियम 39 च्या तरतूदी अन्वये "मालमत्ता कर वसुल करण्याकरीता तरतूद केलेल्या रीतीने वसुल करता येईल असे या अधिनियमान्वये किंवा तदनुसार जाहिर करण्यात आले असेल असा कोणताही कर किंवा अशा कोणत्याही कराचा कोणताही हप्ता देय होईल तेव्हा मा. आयुक्तांनी फारसा विलंब न लावता उक्त कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस, तिने देय असलेल्या रक्कमेचे देयक देण्याची व्यवस्था केली पाहिजे."

तसेच कराधान नियम क्र. 41 च्या तरतूदीन्वये पहिल्या सहामाहीची मागणी रक्कम करदात्यांस मागणी देयक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत महानगरपालिका निधीत करदात्यांनी जमा करणे अनिवार्य आहे. त्यामूळे कोणत्या दिनांकास संबंधित करदात्यांला देयक तामील झालेले आहे त्याबाबतचा पूरावा विभागाकडे असणे गरजेचे आहे. त्याकरीता प्रत्येक मागणी देयकाची मूळ प्रत व कार्यालयीन प्रत अशा दोन प्रती छापणे गरजेचे आहे.

आर्थिक वर्ष 2024-2025 चे मालमत्ता कर मागणी देयके भारतीय डाक विभागाने Speed Post चे माध्यमातून वितरीत करण्याकरीता एकुण 562926 Articles Booked केले, यापैकी 282955 मालमत्ताधारकांना Speed Post द्वारे मागणी देयक प्राप्त झाले असून, याची पोच कार्यालयास प्राप्त झाली आहे. अशा मालमत्ता करीता दोन प्रतीत मागणी देयक छपाई करणे वगळल्यास खुला भुखंड व पत्ते अद्यावत नसलेले मालमत्तांकरीता मागणी देयकांची दोन प्रती छपाई करणे आवश्यक राहील. आर्थिक वर्ष 2025-26 एकुण 750881 मालमत्तेचे सर्वेक्षण झालेले असून 313000 वजा जाता उर्वरीत 437881 मालमत्तांचे मागणी देयक दोन प्रतीत छपाई करावे लागेल. तसेच 1 लक्ष Wastage लक्षात घेता एकुण (437881 X 2 = 875762 + 313000+100000=12,88,762) मागणी देयक छपाई करावे लागतील.

उक्त काम सामान्य प्रशासन विभाग म.न.पा. यांचे दर करार क्र.साप्रवि/409/एम. दि. 01/10/2021 अन्वये JobWorks करीता 2.25/- प्रती प्रमाणे निश्चित असलेल्या दराप्रमाणे करण्यात येत आहे. किमती दर प्रमाणे 13,18,807 मालमत्ता कर मागणी देयक करीता रु. 28,99,715/- खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च पद क्र. A29000622005 या पदातंर्गत खर्च करण्याचे प्रावधान असून या खर्चास मान्यता देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.